**नि.फौ.ख.क्र. १११/२०१६**
सरकार – वि.- दिनेश कसबे
**निशाणी क्र. २५**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ -**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – विनयकुमार संतोषकुमार - फिर्यादी
वय – ४० वर्षे, व्यवसाय – व्यापार,
सध्या रा. - चिखली, पुणे.

**फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे, सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए. एस. काळे यांचे मार्फत सुरु-**

घटना सन २०१६ मध्ये मे महिन्यात चिंचवड रेल्वे स्टेशन येथे पुणे ते लोणावळा लोकल ट्रेनमध्ये संध्याकाळी ०६.३० च्या आसपास घडली आहे. मी माझे वडीलांना सोडण्यासाठी गेलो होतो. ट्रेनमध्ये चढत असताना तेथे जमलेल्या काही लोकांनी गर्दीचा फायदा घेवुन माझे खिशातील मोबाईल व पाकीट चोरले आहे. पाकीटामध्ये ३,५००/- रुपये होते. मोबाईल हा यु युफोरीया कंपनीचा होता. मी चोराला पकडले तेव्हा त्याने माझा मोबाईल गेटवर फेकुन दिला. त्याच्या खिशामध्ये बरेचसे पाकीट मिळुन आले होते. त्यांनतर मी चोराला घेवुन खडकी स्टेशनवर गेलो. तेथुन पोलीसांची मदत घेवुन आम्ही लोहमार्ग पोलीस स्टेशन पुणे येथे आलो. तेथे येवुन मी आरोपीविरुध्द फिर्याद दिली. आता मला माझी फिर्याद दाखवण्यात आली. ती तीच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. २६** देण्यात येतो.

२. आता मला प्रथम खबरी अहवाल दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. २७** देण्यात येतो. मला माझा मोबाईल व पैसे मिळाले नाहीत. आरोपीला आज रोजी पाहिल्यास मी ओळखु शकत नाही.

**सरतपास पुर्ण .**

**आरोपी हा फरार असल्याने उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

दि. ०२/०७/२०२६
स्थळ - पुणे

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.07.02 17:16:02 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.